# कृतज्ञता


## श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांच्या विचारांचे संकलन

ज्योतिर्मयी मिडिया हाऊस, पुणे

# कृतज्ञता

## श्रीअरविंद व श्रीमाताजी यांच्या विचारांचे संकलन

ज्योतिर्मयी मिडिया हाउस, पुणे

श्रीमाताजी आणि श्रीअरविंद
यांच्या चरणी सविनय समर्पित

अनुवाद व संपादन : डॉ. केतकी मोडक
आवृत्ती : ई-आवृत्ती
प्रकाशक : ज्योतिर्मयी मिडिया हाउस, पुणे
प्रकाशन : २५ ऑक्टोबर २०२२
पुस्तक क्रमांक : ०३
संकेतस्थळ : auromarathi.org
ई-मेल : editorabhipsa2018@gmail.com

# अनुक्रमणिका

प्रस्तावना..........०५
गुणसंमेलनात कृतज्ञता..........०६
कृतज्ञ असणे म्हणजे काय?..........०८
करुणा आणि कृतज्ञता..........१०
कृतज्ञतेचे प्रकार..........११
कृतज्ञता - एक आंतरात्मिक भावना..........११
कृतज्ञता - एक दुर्मिळ गोष्ट..........११
कृतज्ञतेचा खरा मार्ग..........१२
कृतज्ञता म्हणजे काय?..........१३
कृतज्ञता - एक शक्तिशाली तरफ..........१३
कृतज्ञता आणि कृतघ्नता..........१४
कर्मांचा गुप्त स्वामी..........१५
ईश्वराचा आश्रय..........१६
श्रद्धायुक्त आत्मदान..........१६
कृतज्ञतापूर्वक स्वीकार..........१७
निरपेक्ष, निर्व्याज कृती..........१९
निंदकाचे घर असावे शेजारी..........२१
सर्वांत मोठा चमत्कार..........२२
प्रेमाला प्रेमाने प्रतिसाद..........२३
कृतज्ञतायुक्त भक्ती..........२४
कृतज्ञ स्मरण..........२५
पावलागणिक जाणवणारी कृतज्ञता..........२६
कृतज्ञतेची अभिव्यक्ती..........२७
कृतज्ञतायुक्त प्रार्थना..........२८
सदिच्छायुक्त कृती..........२८
कृतज्ञ शरणागती..........३१

तत्त्व किंवा इच्छावासना....................................................३२
कृतज्ञता व्यक्त करण्याचा सर्वोत्तम मार्ग...............................३३
कृतज्ञतेची ज्योत..............................................................३३
श्रीअरविंदांविषयी कृतज्ञता..................................................३४

**

**प्रस्तावना**

योगमार्गामध्ये कृतज्ञतेद्वारे चेतनेची एक विशिष्ट अवस्था अभिव्यक्त होते, त्यामध्ये समर्पण व विश्वास या भावनेतून ईश्वराभिमुख होणे असते; ईश्वराकडून ज्या कोणत्या आंतरिक व बाह्य भेटवस्तू मिळतात त्यांचा आनंदाने स्वीकार असतो. किंबहुना, कृतज्ञतेच्या या अवस्थेमध्ये व्यक्ती जीवनातील प्रत्येक घटनाच ईश्वरी कृपेची देणगी आहे, आशीर्वाद आहे, या भूमिकेतून स्वीकारते.

कृतज्ञता म्हणजे काय, ती व्यक्तींबाबत बाळगायची की ईश्वराबाबत, त्याचे साधकाच्या जीवनातील स्थान काय, या आणि या सारख्या अनेक गोष्टी येथे श्रीमाताजी व श्रीअरविंद यांच्या विचारप्रकाशात समजावून घेण्याचा प्रयत्न करूया.

वाचक त्याला प्रतिसाद देतील अशी आशा आहे.

- संपादक

**

## गुणसंमेलनात कृतज्ञता

कोणे एके काळी एक भव्य राजवाडा होता, त्याच्या गाभ्यामध्ये एक गुप्त असे देवालय होते. त्याचा उंबरठा आजवर कोणीच ओलांडलेला नव्हता. एवढेच नव्हे तर, त्या देवालयाचा अगदी बाह्य भागसुद्धा मर्त्य जिवांसाठी जवळजवळ अप्राप्य असाच होता, कारण तो राजवाडा एका अतिशय उंच ढगावर उभारलेला होता आणि कोणत्याही युगातील अगदी मोजकीच मंडळी त्याच्याप्रत पोहोचण्याचा मार्ग शोधू शकत असत.

हा 'सत्या'चा राजवाडा होता.

एके दिवशी तेथे एक उत्सव आयोजित करण्यात आला होता, तो माणसांसाठी नव्हता, तर तो अत्यंत वेगळ्या जीवयोनींसाठी होता. ज्या देवदेवतांना पृथ्वीवर त्यांच्या 'गुणवैशिष्ट्यां'नुसार पूजले जाते, अशा लहानमोठ्या देवदेवतांसाठी तो उत्सव होता.

त्या राजवाड्याच्या प्रवेशद्वाराजवळच एक भलेमोठे सभागृह होते. त्याच्या भिंती, त्याची जमीन, त्याचे छत, सारे काही प्रकाशमान होते. ते असंख्य लखलखणाऱ्या अग्नींनी उजळून निघालेले होते. ते 'बुद्धिमत्ते'चे सभागृह होते. जमिनीजवळ अतिशय सौम्य प्रकाश होता आणि त्याला एक सुंदरशी नीलवर्णी छटा होती, पण छताकडे मात्र ती क्रमाक्रमाने अधिकाधिक सुस्पष्ट होत गेली होती, तेथे हिऱ्यांचे झुबके छताला झुंबरासारखे लटकलेले होते आणि त्यातून असंख्य किरण झगमगत होते.

तेथे प्रत्येक 'सद्गुणा'ने स्वतंत्रपणे प्रवेश केला होता, पण लवकरच त्यांचे समविचारी असे छोटेछोटे समूह तयार झाले. एकदा का होईना, पण सारे एकत्र जमल्यामुळे ते आनंदात होते, कारण अन्यवेळी ते सारे या विश्वामध्ये आणि अन्य लोकांमध्येही दूरदूर पसरलेले असतात, भिन्न भिन्न जिवांमध्ये विखुरलेले असतात.

त्या उत्सवावर 'प्रामाणिकते'ची (Sincerity) सत्ता होती. तिने नितळ पाण्यासारखा, पारदर्शक असा एक पोषाख परिधान केलेला होता, तिच्या हातामध्ये एक अतिशय शुद्ध असे घनाकार स्फटिक होते आणि त्यामधून साऱ्या गोष्टी एरवी जशा दिसतात त्यापेक्षा भिन्न अशा म्हणजे वास्तविक त्या जशा आहेत तशा दिसत होत्या, कारण तेथे

त्यांची प्रतिमा कोणत्याही विकृतीविना प्रतिबिंबित होत होती.

तिच्या जवळच, जणू तिच्या विश्वासू रक्षकांप्रमाणे वाटावेत असे 'विनम्रता' आणि 'धैर्य' हे दोन गुण उभे होते. विनम्रता ही आदरणीय होती आणि त्याच वेळी ती स्वाभिमानी होती. तर धैर्य हा उन्नत-माथा असलेला, स्वच्छ डोळ्यांचा होता, त्याचे ओठ दृढ आणि हसणारे होते, त्याच्या अवतीभोवतीचे वातावरण शांत आणि निर्णायक होते.

'धैर्या'च्या जवळच, त्याच्या हातात हात घालून एक स्त्री उभी होती, तिने स्वतःला पूर्णपणे झाकून घेतलेले होते, तिने परिधान केलेल्या त्या अंगरख्यामधून तिच्या शोधक नजरेव्यतिरिक्त काहीच दिसत नव्हते; अंगरख्याआडून फक्त तिचे डोळे चमकताना दिसत होते, ती 'विवेकबुद्धी' होती.

त्या सगळ्यांमध्ये वावरणारी, इकडून तिकडे ये-जा करणारी आणि तरीही सतत प्रत्येकाजवळच आहे असे वाटावी अशी एक व्यक्ती होती, तिचे नाव 'उदारता' असे होते. ती एकाच वेळी सतर्क आणि शांत होती, ती सक्रिय होती आणि तरीदेखील सर्वांपासून स्वतंत्र होती.

ती त्या समूहामधून बाहेर पडताना, तिच्या मागे एक सौम्य पांढऱ्या रंगाची प्रकाशरेषा सोडून जात होती. 'उदारता' जो प्रकाश प्रस्फुरित करत असते, जो ती सौम्यपणे पसरवित जात असते, त्या प्रकाशाची प्रभा इतकी सूक्ष्म असते की, बहुसंख्य डोळ्यांना ती अदृश्यच असते. ती प्रभा उदारतेला तिच्या अगदी घनिष्ठ मैत्रिणीपासून, कधीही विलग होऊ न शकणाऱ्या अशा सहचारिणीपासून, तिच्या जुळ्या बहिणीपासून म्हणजे 'न्यायबुद्धी'कडून प्राप्त होत असते.

'उदारते'च्या आजूबाजूला 'दयाळूपणा', 'सहनशीलता', 'मृदुता', 'उत्कंठा' आणि तत्सम इतरांनी दिमाखदार घोळका केला होता. सारे जण तेथे उपस्थित होते. पण एकाएकी, त्या सुवर्णमय उंबरठ्यावर एका नवागत स्त्रीचे आगमन झाले.

दरवाज्यापाशी राखण करणाऱ्या द्वारपालांनी मोठ्या नाखुषीने तिला आत प्रवेश करण्यास संमती दिली. त्यांनी तिला यापूर्वी कधी पाहिले नव्हते किंवा त्यांच्यावर प्रभाव पडावा असे तिचे रंगरूपही नव्हते.

ती खरोखरच अगदी लहानशा चणीची आणि सडपातळ होती आणि तिने जो पोशाख परिधान केलेला होता तोही अगदी साधासा, गरिबासारखा होता. ती काहीशी संकोचून, अवघडल्यासारखी काही पावले टाकत पुढे आली. त्या एवढ्या मोठ्या ऐश्वर्यसंपन्न आणि तेजःपुंज लोकांमध्ये, नक्की कोणाकडे जावे हे न कळल्याने, गोंधळून गेलेली ती तिथेच थबकली.

सख्यासोबत्यांबरोबर झालेल्या काही जुजबी संभाषणानंतर, त्यांच्याच विनंतीवरून 'विवेकबुद्धी' पुढे झाली आणि त्या नवख्या व्यक्तीच्या दिशेने गेली. त्या नवख्या स्त्रीला विचार करण्यासाठी वेळ मिळावा म्हणून विवेकबुद्धीने दोन क्षण जाऊ दिले आणि मग त्या स्त्रीकडे बघून ती म्हणाली, ''आत्ता इथे जमलेल्यांपैकी आम्ही सर्व जण नावानिशी आणि प्रत्येकाच्या गुणांनुसार एकमेकांना ओळखतो. आम्ही सारे तुझ्या येण्याने आश्चर्यचकित झालो आहोत कारण तू आमच्यासाठी नवखी आहेस, किंवा किमान आम्ही तुला याआधी कधी पाहिले असल्याचे स्मरत नाही. तू कोण आहेस, ते कृपा करून आम्हाला सांगशील का?"

एक निःश्वास टाकत ती नवखी व्यक्ती उद्गारली, ''या राजवाड्यामध्ये सर्वांना मी अनोळखी असल्याचे वाटत आहे, यामध्ये मला काहीच आश्चर्य वाटत नाहीये, कारण मला क्वचितच कोठे आमंत्रित केले जाते. माझे नाव 'कृतज्ञता'!''

(तात्पर्य : कृतज्ञता हा एक अत्यंत दुर्मिळ गुण आहे.)

- श्रीमाताजी

(CWM 02 : 05-07)

**

## कृतज्ञ असणे म्हणजे काय?

('ईश्वरी साक्षात्कारा'साठी जीवन समर्पित करण्याचा निश्चय) या निश्चयाशी निष्ठा राखायची असेल तर व्यक्तीने प्रामाणिक, एकनिष्ठ, विनम्र आणि आत्मनिवेदनाप्रत (consecration) कृतज्ञ असले पाहिजे, कारण हे गुण सर्व प्रकारच्या प्रगतीसाठी अनिवार्य आहेत आणि एक स्थिर आणि वेगवान प्रगती ही प्रकृतीच्या उत्क्रांतिमय प्रगतीच्या वेगाचे अनुसरण करण्यासाठी अनिवार्य असते. हे गुण नसतील तर कधीकधी

व्यक्तीमध्ये प्रगतीचा आभास निर्माण होऊ शकेल पण तो केवळ बाह्य दिखावाच असेल, ते एक ढोंग असेल आणि पहिल्या वेळीच तो डोलारा कोलमडून पडेल.

'प्रामाणिक' असण्यासाठी, अस्तित्वाचे सारे भाग हे ईश्वराविषयीच्या अभीप्सेमध्ये (Aspiration) संघटित झाले पाहिजेत - एक भाग आस बाळगत आहे आणि इतर भाग नकार देत आहेत किंवा अभीप्सेशी प्रामाणिक राहण्याबाबत बंडखोरी करत आहेत, असे असता कामा नये - ईश्वर हा प्रसिद्धीसाठी किंवा नावलौकिकासाठी किंवा प्रतिष्ठेसाठी किंवा सत्तेसाठी, शक्तीसाठी किंवा बढाईच्या समाधानासाठी नव्हे तर, ईश्वर हा 'ईश्वरा'साठीच हवा असला पाहिजे, आत्मनिवेदनाबाबत अस्तित्वाच्या साऱ्या घटकांनी एकनिष्ठ आणि स्थिर असले पाहिजे म्हणजे एक दिवस श्रद्धा बाळगली आणि दुसऱ्या दिवशी, आपल्या अपेक्षेप्रमाणे गोष्टी घडल्या नाहीत त्यामुळे श्रद्धा गमावली आणि सर्व प्रकारच्या शंकाकुशंकांनी मनात घर केले, असे होता कामा नये. शंका म्हणजे व्यक्तीने ज्यामध्ये रममाण व्हावे असा एखादा खेळ नाही; तर ते एक असे विष आहे की, जे आत्म्याला कणाकणाने क्षीण करत नेते.

आपण कोण आहोत याचे व्यक्तीला अचूक भान असणे आणि आपल्याला कितीही गोष्टी साध्य झालेल्या असल्या तरीही 'आपण काय असले पाहिजे' अशी ईश्वराची आपल्याकडून अपेक्षा आहे, तिच्या परिपूर्तीच्या तुलनेत, आपल्याला साध्य झालेल्या गोष्टी व्यवहारतः अगदी नगण्य आहेत, हे कधीही न विसरणे तसेच, ईश्वराचे व त्याच्या मार्गांचे मूल्यमापन करण्यासाठी आपण अक्षम असतो, याची पुरेपूर खात्री असणे म्हणजे 'विनम्र' असणे होय. एखादी व्यक्ती जशी आहे तशी, म्हणजे तिचे अज्ञान, तिचे समज-गैरसमज, तिचा अहंकार, त्या व्यक्तीचा विरोध, त्या व्यक्तीची बंडखोरी अशा गोष्टी असूनदेखील, परमेश्वराची अद्भुत कृपा त्या व्यक्तीला तिच्या ईश्वरी उद्दिष्टाप्रत अगदी जवळच्या मार्गाने घेऊन जात असते. या अद्भुत कृपेचे कधीही विस्मरण होऊ न देणे म्हणजे 'कृतज्ञ' असणे होय.

- श्रीमाताजी

(The Aims And Ideals of The Sri Aurobindo Ashram : 16-17)

**

## करुणा आणि कृतज्ञता

करुणा आणि कृतज्ञता हे मूलत: चैत्य गुण आहेत. चैत्य पुरुष जेव्हा सक्रिय जीवनामध्ये भाग घेऊ लागतो तेव्हाच चेतनेमध्ये हे गुण प्रकट होऊ लागतात. वास्तविक हे गुण सामर्थ्यशक्तीवर आधारित असतात परंतु, मन व प्राणाला हे गुण म्हणजे दुबळेपणा आहे असे वाटते. कारण ते मनाच्या आणि प्राणाच्या आवेगांना स्वैरपणे प्रकट होण्यापासून रोखतात.

पुरेसे शिक्षित नसलेले मन, हे बहुधा नेहमीच प्राणाचे साथीदार असते आणि शारीर प्रकृतीचे गुलाम असते आणि अशा मनाचे कायदे प्राणाच्या व शरीराच्या अर्धजागृत यंत्रणेमध्ये इतके काही बळकट असतात की, त्यांना करुणा आणि कृतज्ञता या गुणांचा अर्थच नेमकेपणाने समजत नाही. जेव्हा मन प्रथमत: चैत्य हालचालींविषयी जागृत होऊ लागते तेव्हा स्वत:च्या अज्ञानामुळे त्या हालचालींचा ते पार विपर्यास करून टाकते आणि करुणेचे रूपांतर दया किंवा कणव यांमध्ये करून टाकते किंवा फार फार तर त्याचे रूपांतर भूतदयेमध्ये करते. कृतज्ञतेचे रूपांतर परतफेडीच्या इच्छेमध्ये करते...

जेव्हा व्यक्तीमध्ये चैत्य जाणीव ही पूर्णपणे प्रभावी झालेली असते तेव्हाच फक्त ज्या ज्या कोणाला मदतीची गरज भासते, त्या व्यक्तींविषयी तिला करुणा वाटते; मग ती मदत कोणत्याही क्षेत्रातली का असेना. तसेच ज्या कोणत्या गोष्टीमधून ईश्वरी अस्तित्वाची आणि कृपेची अभिव्यक्ती होते अशा सर्व गोष्टींविषयी, मग त्या गोष्टी कोणत्याही रूपामध्ये असू देत, त्या जर त्यांच्या अगदी मूळरूपात आणि तेजोमय शुद्‌धतेने अभिव्यक्त होत असतील तर, कोणत्याही मेहेरबानीचा लवलेशही नसलेली अमिश्रित अशी करुणा किंवा न्यूनगंडाची कोणतीही भावना नसलेली अशी कृतज्ञता, (चैत्य जाणीव प्रभावी झालेल्या व्यक्तीमध्ये) आढळून येते.

- श्रीमाताजी

(CWM 15 : 277)

**

## कृतज्ञतेचे प्रकार

कृतज्ञतेचे पुढील प्रकार आहेत.

'ईश्वरी कृपे'च्या तपशीलांविषयी आपल्यामध्ये जागरूकता निर्माण करणारी जी कृतज्ञता असते ती म्हणजे 'तपशीलवार कृतज्ञता'.

जिच्याद्वारे आपले संपूर्ण अस्तित्व, स्वतःला पूर्ण विश्वासानिशी, त्या 'प्रभू'पाशी समर्पित करते, ती असते 'परिपूर्ण कृतज्ञता'.

मनाची अशी कृतज्ञता की जिच्यामुळे मन प्रगती करू शकते ती म्हणजे 'मानसिक कृतज्ञता'

- श्रीमाताजी

(CWM 14 : 154)

**

## कृतज्ञता - एक आंतरात्मिक भावना

'कृतज्ञता' ही एक आंतरात्मिक भावना आहे आणि जे जे काही आंतरात्मिक असते ते आत्म्याला विकसित होण्यासाठी साहाय्य करते. आध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहता भावनांमध्ये गैर असे काही नाही. फक्त एवढेच की त्या भावना (अध्यात्म) मार्गावरील बंधन ठरता कामा नयेत.

- श्रीअरविंद

(SABCL 24 : 1768)

**

## कृतज्ञता - एक दुर्मिळ गोष्ट

प्रश्न : माझ्या मनात नेहमीच असा विचार येतो की, माताजी मी तुमच्यापाशी माझी कृतज्ञता कशी व्यक्त करू?

श्रीमाताजी : माझ्याप्रति तशी (कृतज्ञता व्यक्त करण्याची) तसदी कोणीच घेत नाही. जेव्हा कधी एखादी अडचण येते, एखादा अडथळा येतो, किंवा एखादा आघात होतो तेव्हा लगेच माझ्यापाशी प्रार्थना केली जाते, मदतीची अशी याचना केली जाते की, "कृपा करून मला वाचवा. कृपा करून मला संरक्षण द्या." किंवा अडचणींवर मात करण्याच्या हेतुनेसुद्धा अशी विनवणी केली जाते की, "माताजी, आम्हाला साहाय्य करा, आमचे संरक्षण करण्यासाठी तुमच्या हातांचा आधार द्या. तुमचा

करुणावर्षाव आमच्यावर होऊ द्या. आमच्यावर दया करा."

आणि मग जेव्हा ईश्वरी 'कृपे'ने तिचे कार्य पूर्ण केलेले असते... मी त्यांच्यासाठी ज्या हजारो गोष्टी सातत्याने करत असते त्याबद्दल ते कधीच कृतज्ञतेचा एक शब्दही उच्चारात नाहीत. मी जेव्हा त्यांचे रक्षण करते, किंवा त्यांच्यासाठी एखाद्या अडचणीवर मात करते, त्यानंतर मात्र एकही शब्द नसतो... ईश्वरी 'कृपे' ने जेव्हा त्यांच्यासाठी सारे काही केलेले असते म्हणजे त्यांना वाचविलेले असते, त्यांचे संरक्षण केलेले असते आणि सर्व अडचणींवर मात केलेली असते तेव्हा खालून कृतज्ञतेचा एक शब्दही ईश्वरी 'कृपे' बाबत उच्चारला जात नाही. त्यांना लगेचच विसर पडलेला असतो. ज्या प्रचंड ईश्वरी शक्तीने त्यांना संकटातून बाहेर खेचून काढले, त्या शक्तीविना ते कसे काय वाचू शकले असते किंवा ते कसे काय सुरक्षित राहू शकले असते, शांत कसे राहू शकले असते? पण याने त्यांना काहीच फरक पडत नाही. त्यांना पूर्ण विसर पडलेला असतो आणि त्यांच्यावर त्याचा कोणताही परिणाम झालेला नसतो, ज्या महान अद्भुत अपूर्व गोष्टीने त्यांना वाचविलेले असते, त्याची त्यांना साधी आठवणदेखील नसते. कृतज्ञतेचा दृष्टिकोन खरोखर अगदी दुर्लक्षित आहे, कृतज्ञतेची कृती या जगात शोधण्यात अर्थ नाही. किमान हे मात्र नक्की की, कृतज्ञता ही अगदी दुर्मिळ गोष्ट आहे.

- श्रीमाताजी

(The Supreme : 59-60)

**

## कृतज्ञतेचा खरा मार्ग

प्रश्न : मनुष्याप्रति आणि ईश्वराप्रति आपली कृतज्ञता व्यक्त करण्याचा सर्वोत्तम मार्ग कोणता?

श्रीमाताजी : तुम्ही येथे मनुष्य आणि 'ईश्वर' यांचा एकत्रित विचार का करत आहात?

मनुष्य हा मूलतः ईश्वरच आहे, हे सत्य असले तरीही, आत्ताच्या घडीला, काही तुरळक अपवाद वगळता, मनुष्यमात्र त्याच्या अंतरंगात असणाऱ्या 'ईश्वरा' विषयी अनभिज्ञ आहे; आणि त्याच्या या अनभिज्ञतेतूनच भौतिक जगताच्या मिथ्यत्वाची घडण झालेली आहे.

मी तुम्हाला या अगोदर लिहिल्याप्रमाणे, आपली कृतज्ञता ही ‘ईश्वरा’प्रतिच असली पाहिजे आणि मनुष्यमात्रासाठी एक सद्भावनायुक्त दृष्टिकोन, परस्पर-सामंजस्य आणि परस्पर-सहकार्य या गोष्टी आवश्यक आहेत.

‘ईश्वरा’प्रति एक प्रगाढ, उत्कट आणि सातत्यपूर्ण संपूर्ण कृतज्ञता जाणवणे हा आनंदी आणि शांत राहण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. आणि ‘ईश्वरा’ प्रत आपली कृतज्ञता व्यक्त करण्याचा एकमेव खरा मार्ग म्हणजे त्याच्याशी तादात्म्य पावणे हा होय.

- श्रीमाताजी

(CWM 16 : 313-314)

**

## कृतज्ञता म्हणजे काय?

‘ईश्वरा’कडून जी ‘कृपा’ प्राप्त झालेली असते त्याबद्दलची स्नेहार्द्र जाणीव म्हणजे कृतज्ञता.

‘ईश्वरा’ने आजवर तुमच्यासाठी जे केले आहे आणि तो आजही तुमच्यासाठी जे करत आहे त्याची एक विनम्र जाणीव म्हणजे कृतज्ञता.

कृतज्ञता म्हणजे ‘ईश्वरा’प्रति दायित्वाची अशी एक उत्स्फूर्त भावना असते की जी तुम्हाला - ‘ईश्वर’ तुमच्यासाठी जे काही करत आहे त्याला तुम्ही अपात्र ठरू नये म्हणून - सर्वोत्तम तेच करायला भाग पाडते.

- श्रीमाताजी

(CWM 14 : 154)

**

## कृतज्ञता - एक शक्तिशाली तरफ

काही जण असे असतात की, ज्यांच्यामध्ये उपजतच कृतज्ञतेची एक शक्ती असते; या समग्र जीवनाच्या पाठीमागे एक आश्चर्यकारक गोष्ट दडलेली आहे अशी त्यांची समजूत असते, आणि त्या गोष्टीप्रत, आत्मीयतेने, भक्तीने, आनंदाने प्रतिक्रिया देण्याची, प्रतिसाद देण्याची एक उत्कट गरज त्यांना भासते. अगदी छोट्यात छोट्या अशा गोष्टीमागे, जीवनातील अगदी लहानशा घटनेमागे, ज्यांना त्या ईश्वराची अनंत ‘कृपा’ किंवा सार्वभौम सौंदर्य जाणवते अशा लोकांमध्ये त्या ईश्वराप्रत

एक प्रकारची कृतज्ञतेची भावना असते.

मला अशी काही माणसं माहीत आहेत की, ज्यांना फारसे काही ज्ञान नव्हते, म्हणजे ते फार शिकलेले होते असे नाही, त्यांची मने अगदीच सर्वसाधारण म्हणता येतील अशी होती परंतु त्यांच्याकडे ही आत्मीयतेची, कृतज्ञतेची क्षमता होती; ज्यामुळे ते सर्व काही देऊ करण्यास तयार असत, ज्यामुळे त्यांना समज येत असे आणि ते कृतज्ञ असत.

अशा व्यक्तींचा, त्यांच्या अंतरात्म्याशी वारंवार संपर्क (Psychic contact) होत असे, तो जवळजवळ नेहमीचाच झाल्यासारखा असे. त्या व्यक्ती जेवढ्या प्रमाणात सक्षम असत, जेवढ्या प्रमाणात सजग असत (अगदी खूप सजग असेसुद्धा नाही, थोड्याशा सजग असल्या तरीसुद्धा) तेवढ्या प्रमाणात त्यांचे उन्नयन झाल्यासारखे, त्यांना कोणीतरी उचलून घेतल्याचे, काहीतरी साहाय्य मिळाल्याचे अशा व्यक्तींना जाणवत असे.

कृतज्ञतेची ही भावना तुम्हाला तुमच्या क्षुद्र आणि त्रासदायक अशा अहंकारातून बाहेर काढत असते. ...स्वत:च्या चैत्य पुरुषामध्ये वसलेल्या 'ईश्वरा'च्या संपर्कात येण्यासाठीची ही अतिशय शक्तिशाली तरफ (lever) आहे. चैत्य पुरुषाशी जोडणारा एक खात्रीशीर धागा म्हणून ती कार्य करते.

- श्रीमाताजी

(CWM 07 : 418-419)

**

## कृतज्ञता आणि कृतघ्नता

कृतघ्नता ही एक अशी गोष्ट आहे की, जी मला नेहमीच अतिशय वेदनादायक वाटत आली आहे. कृतघ्नता अस्तित्वातच कशी राहू शकते हे मला वेदनादायक वाटते. माझ्या जीवनात बघितलेल्या सर्व गोष्टींपैकी ही एक अशी गोष्ट आहे की जी सर्वाधिक असह्य अशी आहे. 'ईश्वरा'बद्दलची ही एक प्रकारची विखारी कटुता आहे.

...कृतघ्नता ही 'मना'च्या बरोबरीने उदयाला आली. प्राण्यांमध्ये ती आढळत नाही. आणि म्हणूनच मला प्राण्यांमध्ये एक प्रकारचा गोडवा जाणवतो, अगदी जे अतिशय क्रूर समजले जातात त्यांच्यामध्येसुद्धा तो

गोडवा असतो, जो मनुष्यामध्ये नसतो.

आणि तरीही सर्व गतिविधींमध्ये, कदाचित सर्वाधिक आनंद देणारी - अहंकाराने न डागाळलेला असा निष्कलंक, निर्भेळ आनंद देणारी एक गोष्ट म्हणजे 'उत्स्फूर्त कृतज्ञता'.

ती काहीतरी एक खास अशी गोष्ट असते. ते प्रेम नसते, ते आत्मार्पणही नसते... तो एक अतीव 'परिपूर्ण' असा आनंद असतो, अगदी परिपूर्ण आनंद. त्याच्यासारखे तेच असे ज्याला म्हणता येईल असे ते एक खास स्पंदन असते. ती एक अशी गोष्ट असते की जी तुम्हाला व्यापक बनवते, ती तुम्हाला भारून टाकते, ती अतिशय उत्कट असते.

मानवी चेतनेच्या आवाक्यात असणाऱ्या सर्व गतिविधींपैकी, ही खरोखरच एक अशी गोष्ट आहे की, जी तुम्हाला तुमच्या अहंकारापासून सर्वांत जास्त बाहेर खेचून काढते.

आणि जेव्हा ही कृतज्ञता निर्हेतुक असते तेव्हा, कृतज्ञतेच्या त्या स्पंदनामुळे अनेक मोठे अडथळे क्षणार्धात नाहीसे होऊ शकतात.

- श्रीमाताजी

(Conversations with a disciple: December 21, 1963)

**

## कर्मांचा गुप्त स्वामी

(श्रीअरविंद येथे यज्ञबुद्धीने केलेल्या अर्पणाबद्दल सांगत आहेत.) हे अर्पण कोणा व्यक्तींना केलेले असेल, 'ईश्वरी शक्तीं'ना केलेले असेल, ते 'विश्वात्मक ईश्वरा'ला केलेले असेल किंवा विश्वातीत असणाऱ्या 'परमेश्वरा'ला केलेले असेल. त्याचप्रमाणे अर्पण केलेली वस्तू म्हणजे एखादे पान असेल, फुल असेल, पाणी असेल, मुठभर धान्य असेल, अन्नधान्य असेल, किंवा आपल्यापाशी जे जे काही आहे त्या सर्वांचे अर्पण असेल, अगदी सर्वस्वाचे अर्पण असेल. स्वीकारणारे कोणीही असू दे, अर्पण म्हणून दिलेली वस्तू कोणतीही असू दे, अगदी नजीकच्या स्वीकारकर्त्याने जरी ती गोष्ट अव्हेरली किंवा दुर्लक्षित केली तरीही, त्या गोष्टीचे ग्रहण करणारा आणि तिचा स्वीकार करणारा, वस्तुमात्रामध्ये 'शाश्वत' रूपाने वसणारा 'परमेश्वर'च असतो. विश्वाच्या अतीत असणारा जो परमेश्वर, तो येथेसुद्धा आहे, मग तो भले कितीही परिवेष्टित

(veiled) का असेना, तो आपल्यामध्ये आहे, या विश्वामध्ये आहे आणि विश्वाच्या घडामोडीमध्येसुद्धा तो आहे. तो येथे सर्वसाक्षी 'साक्षीदार' या नात्याने उपस्थित आहे आणि तोच आपल्या सर्व कर्मांचा 'ग्रहणकर्ता' आणि आपल्या सर्व कर्मांचा गुप्त 'स्वामी' आहे. आपल्या साऱ्या कृती, आपले सारे प्रयत्न, इतकेच काय पण आपली पापं आणि आपले अडखळणे, आपले दुःखकष्ट, आपले संघर्ष या साऱ्या गोष्टी जाणते-अजाणतेपणे, ज्ञात-अज्ञातपणे, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे, अंतिमतः त्या 'एका ईश्वरा'कडूनच संचालित होतात. त्याच्या अगणित रूपांद्वारे सारे काही ईश्वराभिमुखच झालेले असते आणि त्या असंख्य रूपांच्या माध्यमातून सारे काही त्या 'सर्वव्यापी' असलेल्या एकमेवाद्वितीय परमेश्वरालाच अर्पण होत असते. आपण कोणत्याही रूपाच्या माध्यमातून, कोणत्याही भावाने त्याच्याकडे गेलो तरीही, त्या त्या रूपाच्या माध्यमातून, आणि त्या त्या भावाने तो ईश्वरच आपल्या यज्ञाचा स्वीकार करतो.

- श्रीअरविंद

(CWSA 23 : 110)

**

## ईश्वराचा आश्रय

शारीरिक चेतनेने प्रथम एक गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे; ती अशी की, आपल्याला जीवनात ज्या अडचणींना सामोरे जावे लागते त्या साऱ्या अडीअडचणी - आपण आपल्याला आवश्यक असणाऱ्या साहाय्यासाठी फक्त आणि फक्त 'ईश्वरा'वरच विसंबून राहत नाही - या एकाच वास्तवातून उद्भवतात.

वैश्विक 'प्रकृती'च्या यंत्रणेपासून केवळ 'ईश्वर'च आपल्याला मुक्त करू शकतो. नव्या वंशाच्या जन्मासाठी आणि विकसनासाठी ही मुक्ती अपरिहार्य आहे. 'ईश्वरा' प्रत पूर्ण विश्वासाने आणि कृतज्ञतेने स्वतःचे समग्रतया अर्पण केल्यानेच सर्व अडीअडचणींवर मात केली जाईल.

- श्रीमाताजी

(CWM 16 : 433)

**

## श्रद्धायुक्त आत्मदान

आपल्या अस्तित्वाची प्रत्येक कृती, प्रत्येक क्षण म्हणजे त्या

‘शाश्वता’ प्रत सातत्यपूर्वक चाललेले श्रद्‌धायुक्त आत्मदान असले पाहिजे. आपल्या साऱ्या कृती, मग त्या अगदी महान, असामान्य आणि उदात्त असल्या काय, नाहीतर अगदी किरकोळ, अगदी सर्वसामान्य आणि क्षुल्लक असल्या काय, त्या साऱ्या कृती या ‘आत्मनिवेदित कृती’ (con_ secrated acts) म्हणून सादर केल्या पाहिजेत. आपल्या व्यक्तिगत प्रकृतीने अशा एकमेव चेतनेमध्ये निवास केला पाहिजे की, जिच्या साऱ्या आंतरिक आणि बाह्य गतिविधी या आपल्या अहंकाराहून श्रेष्ठ आणि आपल्या अतीत असणाऱ्या ‘कोणत्या तरी गोष्टीप्रत’ अर्पित केलेल्या असतील. आपण काय प्रदान करतो किंवा आपण ते कोणाला प्रदान करतो या गोष्टी फारशा महत्त्वाच्या नाहीत, तर त्या गोष्टी आपण सर्व जीवजातामध्ये अंतर्हित असणाऱ्या एकमेव ईश्वरी अस्तित्वालाच अर्पण करत आहोत, ही चेतना आपल्या कृतीमध्ये असली पाहिजे.

- श्रीअरविंद

(CWSA 23 : 111)

**

## कृतज्ञतापूर्वक स्वीकार

प्रश्न : ‘ईश्वरी कृपा’ कृतज्ञतापूर्वक स्वीकारण्याचा मार्ग कोणता?

श्रीमाताजी : सर्वप्रथम तुम्हाला त्याची आवश्यकता जाणवली पाहिजे.हा सर्वात महत्त्वाचा मुद्‌दा आहे. म्हणजे त्या ईश्वरी कृपेविना तुम्ही असाहाय्य आहात याची जाणीव करून देणारी, एक विशिष्ट अशी आंतरिक विनम्रता असणे आवश्यक आहे. खरोखरच, तुम्ही त्याविना अपूर्ण आणि शक्तिहीन असता. सुरुवात करायची तर ही पहिली गोष्ट आहे. ही पहिली अट आहे...

...आणि मग, ज्या परिस्थितीमध्ये तुम्ही सापडलेले असता, त्या परिस्थितीतून केवळ ती ईश्वरी कृपाच तुम्हाला तारू शकते, तीच तुम्हाला उपाय सुचवू शकते आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी लागणारे सामर्थ्यदेखील तीच देऊ शकते, फक्त ईश्वरी ‘कृपा’च हे सारे करू शकते, अशी जाणीव जर तुम्हाला झाली तर, अगदी स्वाभाविकपणे तुमच्यामध्ये एक उत्कट आस निर्माण होते, चेतना खुलेपणात अभिव्यक्त झालेली असते. तुम्ही जर धावा कराल, आस बाळगाल आणि प्रतिसाद मिळावा

अशी आशा बाळगाल तर, अगदी स्वाभाविकपणे तुम्ही त्या ईश्वरी ‘कृपे’प्रत खुले होता.

आणि नंतर ईश्वरी ‘कृपा’ तुम्हाला जो प्रतिसाद देते, त्याकडे तुम्ही अगदी बारकाईने लक्ष दिले पाहिजे, ती ‘कृपा’ तुम्हाला तुमच्या त्रासामधून बाहेर काढते, ती तुमच्या समस्येवर उपाय सुचविते किंवा तुमच्या अडचणीमधून बाहेर पडण्यास तुम्हाला साहाय्य करते. पण एकदा का तुमची त्या त्रासापासून सुटका झाली आणि तुम्ही त्या अडचणीमधून बाहेर आलात तर, तुम्हाला त्यातून बाहेर काढणारी ‘ईश्वरी कृपा’च होती, हे तुम्ही विसरता कामा नये; तुम्हीच स्वतःला त्या परिस्थितीतून बाहेर काढले आहे, असे समजता कामा नये. हा खरोखरच, महत्त्वाचा मुद्‌दा आहे. अडचण दूर झाली की, लगेचच बहुसंख्य लोक असे म्हणतात, “त्या अडचणीतून मी स्वतःला कसे बाहेर काढले, माझे मलाच माहीत.”

तर हे सारे असे असते. आणि नंतर तुम्ही कडीकोयंडा लावून दरवाजा बंद करून टाकता आणि त्यानंतर मग तुम्ही काहीही ग्रहण करू शकत नाही. तुमच्या अशा प्रकारच्या आंतरिक मूर्खपणापासून स्वतःला बाहेर काढण्यासाठी तुम्ही स्वतः काहीच करू शकत नाही, याची तुम्हाला पुन्हा एकदा जाणीव व्हावी म्हणून, पुन्हा एखादा तीव्र झटका, एखादी भयानक अडचण आवश्यक होऊन बसते. कारण आपण शक्तिहीन आहोत याची जाणीव जेव्हा तुमच्यामध्ये वाढू लागते तेव्हाच, तुम्ही थोडेसे खुले आणि लवचीक होऊ लागता. कारण, तुम्ही जे काही करता ते तुमच्या स्वतःच्या कौशल्यावर आणि तुमच्या स्वतःच्या क्षमतांवर अवलंबून आहे असे जोपर्यंत तुम्हाला वाटत असते तोपर्यंत, तुम्ही एकच दरवाजा बंद करता असे नाही, तर खरोखरच तुम्ही एकापाठोपाठ अनेक दरवाजे बंद करत असता, अगदी कडीकोयंडे लावून ते बंद करत असता. तुम्ही जणू काही एखाद्‌या गढीमध्ये स्वतःला बंद करून घेता आणि मग त्यामध्ये कोणत्याच गोष्टीचा प्रवेश होऊ शकत नाही. ही मोठीच उणीव आहे, व्यक्ती चटकन साऱ्या गोष्टी विसरून जाते. स्वाभाविकपणे ती स्वतःच्याच क्षमतांवर समाधानी राहते.

- श्रीमाताजी

(CWM 06 : 322-323)

**

## निरपेक्ष, निर्व्याज कृती

प्राण्यांचे मन अगदी अर्धविकसित असते. अविरत चालणाऱ्या विचारमालिकांमुळे माणसांची जशी छळवणूक होते तशी, प्राण्यांची होत नाही. उदाहरणार्थ, त्यांच्याशी कोणी प्रेमाने वागले तर, त्यांच्यामध्ये अगदी सहजपणे कृतज्ञतेची भावना निर्माण होते.

पण हेच जर माणसांबाबतीत घडले तर, १०० पैकी ९९ वेळा माणसे विचार करायला लागतात. मनाशीच म्हणतात, ''अमुक एक व्यक्ती माझ्याशी चांगली वागली, त्यामध्ये तिचा नक्की काय हेतू असेल बरे?'' मानसिक क्रियांपैकी ही एक मोठी दुःखद बाब आहे. मात्र प्राणी यापासून मुक्त असतात आणि म्हणून जेव्हा तुम्ही त्यांच्याशी ममत्वाने वागता तेव्हा, ते अगदी सहजपणे तुमच्याविषयी कृतज्ञ राहतात. त्यांचा विश्वास असतो. त्यांचे प्रेम तशा प्रकारचे असते आणि मग त्याचे रूपांतर अगदी घट्ट अशा जवळिकीमध्ये होते. तुमच्या भोवती भोवती घुटमळत राहण्याची एक अदम्य अशी निकड त्यांना भासू लागते.

त्यात आणखीही काही असते. म्हणजे जर मालक खरोखरच चांगला असेल आणि प्राणी विश्वासू असेल तर, त्यांच्यामध्ये एक प्रकारे प्राणिक आणि आंतरात्मिक शक्तींचे आदानप्रदान होते; हे आदानप्रदान प्राण्यांच्या दृष्टीने खूपच सुंदर, अद्भुत असते; ते त्यांना उत्कट आनंद मिळवून देते. अशा प्रकारे, जेव्हा त्यांना तुमच्या जवळ राहायचे असते आणि जेव्हा तुम्ही त्यांना हृदयाशी कवळून घेता तेव्हा, त्यांना आतूनच ते स्पंदन जाणवते. व्यक्ती त्यांना ती शक्ती देते - प्रेमाचे सामर्थ्य, हळुवारतेचे, सौहार्दाचे, संरक्षणाचे, सारे सारे काही - त्यांना जाणवते आणि त्यांच्यामध्ये त्या व्यक्तीविषयीचा एक खूप गाढ असा अनुबंध निर्माण होतो. इतकेच काय पण त्यामधून, कुत्री, हत्ती आणि घोड्यांसारख्या वरच्या श्रेणीतील प्राण्यांमध्ये तर, अगदी उत्स्फूर्तपणे एक प्रकारची भक्तीची गरज निर्माण होते. (मनाच्या सर्व तार्किकतेनेही किंवा युक्तिवादांनीही ती नाकारता येत नाही.) ती मुळातच अगदी विशुद्ध आणि उत्स्फूर्त अशी भावना असते.

मनुष्यामध्ये मनाचे कार्य सुरू झाले तेव्हा, त्याच्या अगदी प्राथमिक अवस्थेमध्ये, त्याच्या पहिल्यावहिल्या आविष्करणामध्ये, त्याने

अनेक गोष्टी बिघडवून टाकल्या, ज्या वास्तविक पूर्वी खूप सुंदर होत्या.

तेव्हा हे उघड आहे की, माणूस जर उच्चतर पातळीवर जाईल आणि त्याच्या बुद्‌धीचा सुयोग्य उपयोग करेल तर, त्यामुळे गोष्टींना अधिक मूल्य प्राप्त होईल. पण या दोहोंच्या दरम्यान, एक असा प्रांत आहे की, जेथे माणूस त्याच्या बुद्‌धिमत्तेचा वापर अगदी असभ्य आणि खालच्या पातळीवरून करतो. तो मनाला हिशोबाचे, वर्चस्वाचे, फसवणुकीचे साधन बनवितो आणि त्यामुळे ते मन कुरूप होऊन जाते. मला जीवनात असे काही प्राणी माहीत आहेत की, ज्यांना मी माणसांपेक्षाही अधिक श्रेष्ठ समजत असे. कारण तो घृणास्पद हिशोबीपणा, दुसऱ्यांना फसवायचे आणि स्वतःचा लाभ करून घेण्याची इच्छा त्या प्राण्यांच्या ठिकाणी नसायची. असेही काही प्राणी असतात की, जे माणसाच्या सहवासात आल्यानंतर या साऱ्या गोष्टी शिकतात, पण काही प्राणी असे असतात की, ज्यांच्या ठायी याचा लवलेशही नसतो.

या जगातील चैत्य जाणिवेच्या (psychic consciousness) अनेकविध सुंदर रूपांपैकी, 'निरपेक्ष, निर्व्याज कृती' हे एक सर्वोत्तम रूप आहे. (उत्क्रांतीच्या श्रेणीमध्ये प्राणिजगताकडून मनुष्यजगताकडे) तुम्ही मानसिक गतिविधींच्या दिशेने जसजसे वरवर चढू लागता तसतशी ही निरपेक्ष, निर्व्याज कृती दुर्मिळ होऊ लागल्याचे आढळते. कारण बुद्‌धी आली की त्या बुद्‌धीच्या बरोबरीने सर्व चलाखी, अक्कलहुशारी, भ्रष्टपणा, देवाणघेवाण यांची सुरुवात होते.

उदाहरणार्थ असे पाहा की, जेव्हा एखादे गुलाबाचे फूल उमलते तेव्हा ते अगदी सहज-स्वाभाविकपणे उमलते. सुंदर असण्याच्या आनंदाने, मधुर सुगंध देण्यासाठी, जीवनाचा आनंद अभिव्यक्त करण्यासाठी ते उमलते; कोणत्याही लाभहानीचा ते विचार करत बसत नाही, त्याला त्यामधून काही मिळवायचे नसते, ते अगदी सहजस्फूर्तपणे, अस्तित्वाच्या आणि जीवनाच्या आनंदाने बहरून येते. आणि आता याच्या जागी, उदाहरण म्हणून मनुष्याचा विचार करू. काही सन्माननीय अपवाद वगळता, ज्या क्षणी मनुष्याचे मन सक्रिय होते त्याच क्षणी मन त्या सौंदर्यापासून आणि हुशारीपासून काही लाभ मिळवू पाहते; त्यापासून काहीतरी मिळावे अशी त्याची अपेक्षा असते, लोकांकडून स्तुती किंवा

कौतुक किंवा त्याहीपेक्षा जास्त असा काहीतरी लाभ व्हावा अशी त्याची अपेक्षा असते. परिणामत: चैत्य दृष्टिकोनातून पाहिले असता, गुलाबाचे फूल हे माणसापेक्षा अधिक चांगले असते.

- श्रीमाताजी

(CWM 05 : 239-240)

**

## निंदकाचे घर असावे शेजारी

(श्रीमाताजी येथे 'धम्मपदा'तील एका वचनाविषयी विवेचन करत आहेत.)

मानवी प्रगतीसाठी उपयुक्त असणाऱ्या सर्वच धर्मग्रंथांमध्ये नेहमीच असे सांगितलेले आढळते की, जो तुम्हाला तुमचे दोष दाखवून देतो त्या व्यक्तीविषयी तुम्ही कृतज्ञ असले पाहिजे आणि त्याच्या सहवासाची तुम्ही इच्छा बाळगली पाहिजे. पण येथे धम्मपदामध्ये तीच गोष्ट मोठ्या समर्पकपणे सांगितलेली आहे : एखादा दोष तुम्हाला दाखविण्यात आला तर जणू काही तुम्हाला खजिनाच दाखविण्यात आला आहे, असे समजा. म्हणजेच याचा अर्थ असा की, जेव्हा जेव्हा तुम्हाला तुमच्यामध्ये एखादा दोष, अक्षमता, आकलनक्षमतेचा अभाव, दुर्बलता, अप्रामाणिकपणा, तुम्हाला प्रगतीपासून रोखणारे असे जे जे काही तुमच्यामध्ये सापडेल तेव्हा ते म्हणजे जणू काही अद्‌भुत खजिनाच लाभल्यासारखे तुम्हाला वाटेल.

"अरे देवा, अजून एक दोष!" असे म्हणत न बसता व त्याविषयी खंत बाळगत न बसता, उलट तुम्हाला जणूकाही एखादी अद्‌भुत उपलब्धी झाली असल्याप्रमाणे आनंद झाला पाहिजे. कारण आजवर जी गोष्ट तुम्हाला प्रगत होण्यापासून रोखत होती, ती गोष्ट आता तुमच्या पकडीत आलेली असते. आणि एकदा का ती गोष्ट तुमच्या पकडीत आली की, तिला खेचून बाहेर काढा. कारण असे मानले जाते की जो योगसाधना करतो, त्याला ज्या क्षणी अमुक एक गोष्ट करण्यास योग्य नाही असे समजते, त्याच क्षणी ती दूर सारणे, बाद करणे आणि नष्ट करणे ही शक्ती त्याच्या ठायी असते.

दोषाचा शोध लागणे ही एक प्राप्ती असते, उपलब्धी असते. जणू

काही नुकत्याच बाहेर घालवून दिलेल्या धूसरतेच्या छोट्या कणाची जागा घेण्यासाठी प्रकाशाचा पूर आत शिरला आहे.

तुम्ही जर योगसाधना करत असाल, तर तुम्ही दुर्बलता, नीचता, इच्छाशक्तीचा अभाव, ज्ञानापाठोपाठ सामर्थ्य न येणे ह्या बाबींचा स्वीकार करता कामा नये. एखादी गोष्ट आपल्यात असता कामा नये याची जाणीव होणे आणि तरीही ती तशीच चालू ठेवणे हे दुर्बलतेचे लक्षण असते; ही दुर्बलता कोणत्याही गंभीर अशा योगसाधनेत स्वीकारली जात नाही; अशा संकल्पशक्तीचा अभाव हा व्यक्तीला अप्रामाणिकतेच्या उंबरठ्यावर आणून सोडतो.

अमुक एक गोष्ट असता कामा नये, हे तुम्हाला ज्या क्षणी कळते, तेव्हा ती गोष्ट आपल्यात राहता कामा नये, हे ठरविणारे तुम्हीच असता. कारण ज्ञान आणि सामर्थ्य ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणजे असे म्हणता येईल की, तुमच्या अस्तित्वाच्या कोणत्याही भागात तुम्ही तुमच्या प्रगतीच्या मध्यवर्ती संकल्पशक्तीला विरोधी असणाऱ्या, वाईट इच्छेच्या छायेला थारा देता कामा नये; कारण तसे केल्याने ज्या अनिष्टाचा तुम्ही नायनाट केला पाहिजे त्याच अनिष्टासमोर तुमच्या प्रगतीची संकल्पशक्ती पौरुषहीन, दुबळी, धैर्यहीन, सामर्थ्यहीन ठरते...

अज्ञानातून घडलेले पाप हे पाप नसते; तो या जगतातील सर्वसाधारण अशा अनिष्टाचा एक भाग असतो; पण तुम्हाला माहीत असूनदेखील तुम्ही जेव्हा पाप करता तेव्हा ते अधिक गंभीर असते. याचा अर्थ असा की, फळामध्ये ज्याप्रमाणे एखादा कृमी दडून बसलेला असतो तसा दुरिच्छेचा एखादा घटक तुमच्यामध्ये दडून बसलेला असतो, त्याला शोधून कोणत्याही परिस्थितीत नष्ट केले पाहिजे, कारण बरेचदा अशा वेळी दाखविलेली दुर्बलता ही पुढे जाऊन कधीच दुरुस्त न होऊ शकणाऱ्या अडचणींचे कारण बनते.

- श्रीमाताजी

(CWM 03 : 220-221)

**

## सर्वांत मोठा चमत्कार

कोणते तरी संकट आल्याशिवाय लोकांना 'ईश्वरी कृपे'च्या कार्याची

जाणीवच होत नाही; म्हणजे जेव्हा एखादा अपघात घडणार असतो किंवा एखादा अपघात घडलेला असतो आणि त्यातून ते सहीसलामत वाचलेले असतात, तेव्हा लोकांना त्या कृपेची जाणीव होते. पण एखादा प्रवास किंवा तत्सम कोणता प्रसंग, जर विनाअपघात सुरळीत पार पडला, तर ती त्याहूनही अधिक उच्च अपरिमित अशी 'ईश्वरी कृपा' आहे, याची त्यांना कधीच जाणीव नसते. म्हणजे खरंतर, काहीही विपरित घडू नये अशा रीतीनेच तेथे सुसंवाद प्रस्थापित झालेला असतो. पण लोकांना मात्र ते अगदी सहजस्वाभाविक असल्यासारखे वाटते.

लोक आजारपणातून जेव्हा पटकन बरे होतात, तेव्हा त्यांच्याठायी कृतज्ञता असते; पण एरवी जेव्हा ते ठणठणीत बरे असतात तेव्हा त्यांना कृतज्ञ असावे असे कधीच वाटत नाही. खरंतर, हीच मोठी आश्चर्याची गोष्ट आहे !

- श्रीमाताजी

(CWM 05 : 406)

**

**प्रेमाला प्रेमाने प्रतिसाद**

(धम्मपदातील एका वचनाबद्दल श्रीमाताजी भाष्य करीत आहेत...)

मी तुम्हाला आश्चर्याचा धक्का देणार आहे. तो असा की, हे जग बदलावे म्हणून जर द्वेषभावनेला प्रेमभावनेने प्रत्युत्तर द्यायचे असेल तर, प्रेमाला प्रेमाने प्रतिसाद द्यावा हे अधिक जास्त स्वाभाविक नाही का?

हे जीवन, कृती आणि माणसांची हृदये जशी आहेत तशीच विचारात घेतली तर, 'ईश्वरी कृपा' या विश्वावर 'प्रेमा'चा जो अपरिमित वर्षाव करते त्या प्रेमाला प्रत्युत्तर म्हणून मिळणारा सर्व द्वेष, तिरस्कार तसेच अलिप्तता पाहून आश्चर्यचकित होण्याचा व्यक्तीला नक्कीच अधिकार आहे; कारण या विश्वाला ईश्वरी आनंदाकडे घेऊन जाण्यासाठी म्हणून हे अपरिमित ईश्वरी 'प्रेम' प्रत्येक क्षणाला कार्य करत असते आणि तरीसुद्धा त्याला मानवी हृदयामध्ये अत्यल्प प्रतिसाद मिळतो.

परंतु लोकांना दुष्ट, अपंग, ज्यांच्या बाबतीत काहीतरी अघटित घडलेले असते अशांविषयी, अपयशी व्यक्तींविषयी, अपयशाविषयी कणव

असते - वास्तविक हे एक प्रकारे त्या दुष्टतेला आणि अपयशाला दिलेले प्रोत्साहनच असते. समस्येच्या या पैलूचा व्यक्तीने थोडा अधिक विचार केला तर कदाचित द्वेषाला प्रेमाने प्रतिसाद देण्याच्या आवश्यकतेवर भर देण्याची गरज कमी भासेल. कारण मानवी हृदयामध्ये ज्या ईश्वरी प्रेमाचा वर्षाव केला जात असतो त्या प्रेमाला, जर त्याने, जे समजून घेऊ शकते आणि जे दाद देऊ शकते अशा प्रेमाच्या उत्स्फूर्त कृतज्ञतेनिशी आणि पूर्ण प्रामाणिकतेनिशी प्रतिसाद दिला तर, विश्वामध्ये गोष्टी त्वरेने बदलू शकतील.

- श्रीमाताजी

(CWM 03 : 187)

**

## कृतज्ञतायुक्त भक्ती

तुमच्यामध्ये भक्तिभाव असतो आणि तरीही तुम्ही तुमचा अहंकारही सांभाळत राहता. आणि नंतर मग हा अहंकारच तुम्हाला भक्तीच्या माध्यमातूनसुद्धा अनेक प्रकारच्या गोष्टी करायला भाग पाडतो, अगदी अत्यंत अहंकारी गोष्टी करायलासुद्धा भाग पाडतो. म्हणजे असे की, तुम्ही फक्त तुमचाच विचार करत राहता, इतरांचा नाही, जगाचा नाही, कार्याचाही नाही किंवा जे करायला हवे त्याचाही नाही तर, तुम्ही फक्त स्वत:च्याच भक्तीचा विचार करत राहता आणि त्यामुळेच तुम्ही प्रचंड अहंकारी बनता. आणि म्हणून, जेव्हा तुम्हाला असे आढळते की, ईश्वर कोणत्याही कारणाने म्हणा पण, तुम्हाला अपेक्षित आहे तेवढ्या उत्साहाने तुमच्या भक्तीला प्रतिसाद देत नाही तेव्हा, तुम्ही निराश होता आणि निराशेतच अडकून राहाता.

म्हणजे, एकतर ईश्वर निष्ठुर आहे असे तुम्हाला वाटू लागते. आपण अशा गोष्टी वाचल्या आहेत. उत्साही भक्तांच्या तर अशा कितीतरी गोष्टी असतात. असे उत्साही भक्त मग 'ईश्वरा'वर टिका करू लागतात. कारण (त्यांच्यादृष्टीने) 'ईश्वर' आता त्यांच्याबाबतीत पूर्वीप्रमाणे जवळचा, प्रेमळ उरलेला नसतो, तो दूर निघून गेलेला असतो. मग असा भक्त (मनाशीच) म्हणू लागतो, "तू मला उद्ध्वस्त करून का गेलास? तू मला असे टाकून का गेलास? तू खूप निष्ठुर आहेस."

त्यांच्यामध्ये प्रत्यक्ष असे म्हणण्याचे धाडस नसते पण ते असा विचार करत असतात; अन्यथा मग ते म्हणतात, 'मी नक्कीच काहीतरी घोर पातक केले असले पाहिजे आणि म्हणूनच ईश्वराने मला दूर लोटले आहे." आणि ते निराशेच्या गर्तेमध्ये जाऊन पडतात.

म्हणून श्रद्धेबरोबर एक स्पंदनही असायला हवे.... एक अशी कृतज्ञतेची भावना हवी की, 'ईश्वर' अस्तित्वात आहे. ही कृतज्ञतेची अद्भुत भावना, तुम्हाला उत्कट आनंदाने भारून टाकते. तुम्हाला जाणवू लागते की, आपल्याला दिसतो तसा, या विश्वामध्ये दिसणारा भयानकपणाच फक्त अस्तित्वात आहे असे नाही तर, या विश्वामध्ये 'ईश्वर' म्हणूनही काहीतरी अस्तित्वात आहे, होय, येथे 'ईश्वर' आहे, ईश्वरी अस्तित्व आहे!

जेव्हा कधी, एखादी अगदी छोटीशी गोष्ट, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे त्या ईश्वरीय अस्तित्वाच्या उदात्त 'वास्तवा'शी तुमचा संपर्क घडविते तेव्हा, त्या प्रत्येक वेळी, तुमचे हृदय अगदी उत्कट, अगदी अद्भुत आनंदाने, कृतज्ञतेने भरून जाते. बाकी सर्व गोष्टींच्या तुलनेत अशी कृतज्ञता म्हणजे सर्वाधिक आनंददायी गोष्ट असते.

दुसरी कोणतीच गोष्ट तुम्हाला कृतज्ञतेइतका आनंद देऊ शकत नाही. व्यक्ती एखाद्या पक्षाचे गाणे ऐकते, एखादे सुंदरसे फूल पाहते, एखाद्या लहानग्या बालकाकडे पाहते, उदारतेची एखादी कृती पाहते, एखादे चांगलेसे वाक्य वाचते, मावळत्या सूर्याकडे पाहते, असे काहीही असू शकते की, जे अवचितपणे तुमच्या समोर येते आणि मग, हे विश्व 'ईश्वरा'ची अभिव्यक्ती करत आहे, या विश्वापाठीमागे असे काहीतरी आहे की, जे 'ईश्वरी' आहे यासारखी उत्कट, गाढ, तीव्र अशी भावना मनात दाटून येते.

म्हणून कृतज्ञतेविना भक्ती ही अपूर्ण आहे; भक्तीसोबत कृतज्ञतादेखील असायलाच हवी.

- श्रीमाताजी

(CWM 08 : 39-40)

**

## कृतज्ञ स्मरण

रोज सकाळी तुम्ही जेव्हा झोपून उठता तेव्हा, तुमच्या दिवसाची

सुरुवात तुम्ही मानववंशाचे त्राते असणाऱ्या महान समुदायाविषयी कृतज्ञतेने, प्रेमाने आणि स्तुतीने करा. (येथे श्रीमाताजी आध्यात्मिकतेची शिकवण देणाऱ्या संतमंडळींबद्दल सांगत आहेत.) ते सारे एकसारखेच असतात. पूर्णत्वाची अवघड चढण चढता येण्यासाठी मदत करावी या हेतुने ते मार्गदर्शक म्हणून, प्रशिक्षक म्हणून, त्यांच्या बांधवांचे विनम्र आणि अद्‌भुत सेवक म्हणून, आजवर जन्म घेत आले आहेत, ते आत्ताही आहेत, आणि काळाच्या अंतापर्यंत असणार आहेत. जेव्हा तुम्ही जागे व्हाल तेव्हा तुमचे विचार पूर्ण विश्वासाने आणि कृतज्ञतेने त्यांच्यावर एकाग्र करा. लवकरच या एकाग्रतेचे लाभदायक परिणाम तुमच्या अनुभवास येतील. तुमच्या हाकेला त्यांचे अस्तित्व प्रतिसाद देत आहे असे तुम्हाला जाणवेल, त्यांच्या प्रकाशाने व प्रेमाने तुम्हाला कवळले आहे, त्यांच्या प्रकाशाच्या आणि प्रेमाच्या रंगात तुम्ही न्हाऊन निघाले आहात असे तुम्हाला जाणवेल. आणि मग थोडेसे अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठीचे, थोडे अधिक प्रेम करण्यासाठीचे, अधिक सेवा करण्यासाठीचे तुमचे दैनंदिन प्रयत्न अधिक परिणामकारक आणि अधिक सहजसुलभ होतील. तुम्ही इतरांना जी मदत कराल ती अधिक परिणामकारक ठरेल आणि तुमचे हृदय एका अतूट आनंदाने भरून जाईल.

- श्रीमाताजी

(CWM 02 : 115-116)

**

## पावलागणिक जाणवणारी कृतज्ञता

व्यक्तीच्या आत्मदानामध्ये एक महान शुद्धी आणि एक उत्कटता असली पाहिजे, 'तसेच आपल्यासाठी काय हिताचे आहे, काय नाही, हे आपल्यापेक्षा 'ईश्वरा'ला अधिक चांगले कळते,' असा ईश्वरी 'कृपे'च्या परमप्रज्ञेविषयी एक प्रगाढ विश्वास व्यक्तीला असला पाहिजे. आणि मग असे सारे असताना, व्यक्तीने स्वतःची अभीप्सा अर्पण करताना, स्वतःला पुरेशा उत्कटतेने ईश्वराप्रत झोकून दिले तर त्याचे परिणाम अद्‌भुत असतात. परंतु त्याकडे कसे पाहायचे हे व्यक्तीला उमगलेच पाहिजे. कारण जेव्हा ते परिणाम घडून येतात म्हणजे जेव्हा त्या गोष्टी प्रत्यक्षात उतरतात तेव्हा बहुतेक लोकांना त्या अगदी स्वाभाविक वाटतात, त्या

गोष्टी का आणि कशामुळे घडल्या याकडे त्यांचे लक्षच नसते आणि ते स्वतःशीच म्हणतात, "हो, हे असेच घडायला हवे होते." आणि मग ते कृतज्ञतेचा आनंद गमावून बसतात. त्यांचे हृदय जर ईश्वरी 'कृपे' विषयी धन्यवाद देण्याच्या आणि कृतज्ञतेच्या भावनेने कृतकृत्य होऊ शकले तर, त्यामुळे जणू (कुशल चित्रकाराने) अखेरचा कुंचला फिरवावा तसे काहीसे होते आणि मग प्रत्येक पावलागणिक व्यक्तीला जाणवायला लागते की, 'गोष्टी जशा असायला हव्यात, जशा घडू शकतात, अगदी तशाच, सर्वोत्तम रीतीने त्या घडत आहेत.'

- श्रीमाताजी

(CWM 07 : 239)

**

## कृतज्ञतेची अभिव्यक्ती

कधीकधी व्यक्ती अगदी उदारतेने केलेली एखादी कृती पाहते, जगावेगळे असे काहीतरी तिच्या कानावर पडते; उदारता, आत्म्याची थोरवी किंवा एखाद्या धाडसी वीराने केलेली कृती व्यक्ती पाहते, कधीकधी काही विशेष प्रतिभासंपन्न अशा गोष्टी ती पाहते किंवा एखादी गोष्ट अत्यंत असाधारण पद्धतीने, सुंदरतेने केली असल्याचे व्यक्ती पाहते, ते करणाऱ्या व्यक्तीशी तिची गाठभेठ होते; अशा प्रत्येक वेळी व्यक्तीच्या मनामध्ये अचानकपणे एक प्रकारचा उत्साह, एक प्रकारचे कौतुक, एक प्रकारची कृतज्ञता दाटून येते आणि त्यातूनच अभूतपूर्व अशा आनंदाची, एका उबदार, प्रकाशमय, चेतनेच्या एका नव्या स्थितीकडे घेऊन जाणारी द्वारे खुली होतात. हा देखील मार्गदर्शक सूत्र पकडण्याचा एक मार्ग आहे.

*

'ईश्वरा'प्रत कृतज्ञता व्यक्त करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे आनंदी राहणे.

'ईश्वरा'प्रत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, शांतीपूर्वक आनंदी राहण्यासारखा अन्य कोणताही चांगला मार्ग नाही.

- श्रीमाताजी

(CWM 08 : 405), (CWM 14 : 154-155)

**

## कृतज्ञतायुक्त प्रार्थना

प्रार्थना ही बरीचशी बाह्य गोष्ट आहे, ती बहुधा कोणत्यातरी एका विशिष्ट बाबीसंबंधी असते आणि ती नेहमीच सूत्रबद्ध असते कारण सूत्रातून प्रार्थना तयार होते. एखादी व्यक्ती जर अभीप्सा बाळगत असेल; आणि जरी ती त्या व्यक्तीला प्रार्थनेसमान भासत असेल तरीही प्रार्थनेपेक्षा 'अभीप्सा' सर्वच बाबतीत कितीतरी सरस ठरते. अभीप्सा ही प्रार्थनेपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात 'ईश्वरा'च्या जवळ असते कारण अभीप्सा बाळगणारी व्यक्ती तिला, जे काही ईश्वरार्पण करायचे असते ते, व्यक्ती 'स्व'ला विसरून करत असते.

तसेच ती व्यक्ती जे काही बनू इच्छिते किंवा जे काही करू इच्छिते त्यामध्ये निमग्न होऊन ती गोष्ट ती व्यक्ती करत असते. तुम्ही काहीतरी मागण्यासाठी प्रार्थना करू शकता, तसेच 'ईश्वरा'ने तुम्हाला जे काही देऊ केले आहे त्याबद्दल त्याचे आभार मानण्यासाठीसुद्धा तुम्ही प्रार्थना करू शकता, आणि अशी प्रार्थना ही अधिक चांगली! अशी प्रार्थना म्हणजे कृतज्ञतापूर्वक केलेली कृती असते, असे तिच्याबाबत म्हणता येईल. 'ईश्वरा'ने तुमच्याबाबतीत जो कनवाळूपणा दाखविला, त्याने तुमच्यासाठी जे काही केले, त्याबद्दलची कृतज्ञता म्हणून, तसेच तुम्हाला त्या 'ईश्वरा'मध्ये जे काही आढळून आले त्याची स्तुती करायची तुमची इच्छा आहे म्हणून तुम्ही प्रार्थना करू शकता. या सर्व गोष्टींना प्रार्थनेचे रूप येऊ शकते. ही निश्चितपणे सर्वोच्च प्रार्थना असते कारण ती केवळ स्वत:मध्येच मग्न नसते, ती अहंमन्य अशी प्रार्थना नसते.

- श्रीमाताजी

(CWM 05 : 141)

**

## सदिच्छायुक्त कृती

प्रश्न : माताजी, आम्ही जेव्हा काहीतरी चांगले करण्यासाठी प्रयत्न करू लागतो आणि कोणतीच प्रगती होताना दिसत नाही, तेव्हा आमची निराशा होते. अशा वेळी काय करावे?

निराशा आपल्याला कोठेच घेऊन जात नाही. सुरुवातीलाच एक

गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. आपण स्वतःलाच एक गोष्ट सांगितली पाहिजे की, आपण प्रगती करत आहोत की नाही, हे जाणण्यासाठी आपण पूर्णतः अक्षम असतो. कारण आपल्याला जेव्हा साचलेपण (stagnation) आल्यासारखे वाटते तेव्हा ती स्थिती बरेचदा दीर्घकाळाची असू शकते, परंतु ती निश्चितच अंतहीन नसते तर ती पुढे झेप घेण्यासाठीची पूर्वतयारी असते. कधी कधी या पूर्वतयारीचा कालावधी काही आठवडे किंवा महिने चालू असल्याचे आपल्या निदर्शनास येते. आणि नंतर दीर्घकाळपर्यंत ज्याची तयारी चालू होती ती गोष्ट एकदम अचानक प्रत्यक्षात उतरलेली दिसून येते आणि मग आपल्याला बराच लक्षणीय बदल झालेला दिसून येतो आणि हा बदल एकाच वेळी अनेक बाबतीत झालेला असतो.

योगातील सर्व गोष्टींप्रमाणेच, प्रगतीसाठी केलेले प्रयत्न हे देखील प्रगतीसाठी केलेल्या प्रयत्नांच्या प्रेमाखातरच केले गेले पाहिजेत. प्रयत्नांचा आनंद, प्रगतीची आस या गोष्टी स्वयमेव पुरेशा असल्या पाहिजेत, त्या त्याच्या परिणामांवर अवलंबून असता कामा नयेत. व्यक्तीने योगामध्ये केलेली प्रत्येक कृती ही, ती कृती करण्याच्या आनंदासाठीच केली पाहिजे, त्यापासून व्यक्तीला ज्या फळाची अपेक्षा असते, त्या फळासाठी ती कृती व्यक्तीने करता कामा नये. खरोखरच, जीवनामध्ये नेहमीच, कोणत्याही गोष्टीचे फळ आपल्या हाती नसते. आपल्याला जर योग्य दृष्टिकोन बाळगण्याची इच्छा असेल तर त्यासाठी आपण काय केले पाहिजे? आपण जे करणे आवश्यकच आहे, तीच गोष्ट आपण अगदी उत्स्फूर्तपणे केली पाहिजे, ती गोष्ट आपल्याला जाणवली पाहिजे, आपण त्या गोष्टीचाच विचार केला पाहिजे, आणि त्याचा काहीतरी परिणाम साध्य करून घेण्याच्या दृष्टीने नव्हे तर, ती गोष्ट मिळविण्यासाठीच धडपड केली पाहिजे. आपण ज्या क्षणी परिणामाचा विचार करायला लागतो त्या क्षणीच सौदेबाजी करायला सुरुवात करतो आणि अशा रीतीने त्या प्रयत्नांमधील सारी प्रामाणिकता हरवून जाते. तुम्ही प्रगतीसाठी प्रयत्न करता कारण तुम्हाला प्रयत्न करण्याची, प्रगती करण्याची एक अनिवार्य अशी निकड आतूनच जाणवते; आणि हे प्रयत्न म्हणजे तुम्ही तुमच्या अंतरंगातील 'ईश्वरी चेतने'ला, 'विश्वा'तील 'ईश्वरी

चेतने'ला अर्पण केलेली भेट असते, कृतज्ञता व्यक्त करण्याचा, स्वतःला अर्पण करण्याचा तो तुमचा मार्ग असतो...

समजा, तुम्हाला प्रगती करण्याची इच्छा आहे, तुम्ही स्वतःवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहात, उदाहरणार्थ, तुम्हाला तुमच्यातील विशिष्ट दोषांवर मात करायची आहे, कमतरतेवर, उणिवांवर मात करायची आहे पण तुमच्या प्रयत्नांचे तुम्हाला कमीअधिक परिणाम लवकरात लवकर दिसून यावेत अशी तुमची अपेक्षा असेल तर, अशा वेळी तुमच्या प्रयत्नांमधील सर्व प्रामाणिकपणा तुम्ही हरवून बसता, कारण आता तो एक व्यवहार बनलेला असतो. तुम्ही म्हणता, ''मी आता प्रयत्न करणार आहे, पण ते याचसाठी की, त्या प्रयत्नांच्या मोबदल्यात मला अमुक अमुक गोष्ट हवी आहे.'' अशा वेळी तुमच्यातील उत्स्फूर्तता, सहजता नाहीशी झालेली असते.

तेव्हा दोन गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. परिणाम काय असायला हवा हे ठरविण्यासाठी आपण अक्षम असतो. आपण जर आपला विश्वास ईश्वरावर ठेवला, आणि आपण जर म्हणालो की, ''मी आता सारे काही प्रदान करू इच्छितो, अगदी सारे काही, मला जे जे देणे शक्य आहे, ते ते सारे प्रयत्न, एकाग्रता या साऱ्या गोष्टी मी देऊ इच्छितो आणि त्याच्या मोबदल्यात मला काय द्यायचे किंवा काही द्यायचे की नाही, हे देखील तो ईश्वरच ठरवेल आणि त्याचे परिणाम काय असतील हे मला माहीत नाहीत.'' आपल्यामधील कोणतीही गोष्ट रूपांतरित होण्याआधीच आपल्याला आपण कोणती दिशा पकडणार आहोत, कोणता मार्ग निवडणार आहोत याविषयी काही कल्पना असते का? या रूपांतरानंतर कोणता आकार त्याला प्राप्त होणार आहे, याची थोडीतरी कल्पना आपल्याला असते का ? नाही, अजिबात नसते. त्यावेळी, ती केवळ आपली कल्पना असते आणि सहसा जे परिणाम घडून येणार आहेत त्यांना आपण मोठ्या प्रमाणात मर्यादित करतो, आणि त्यांना आपण अगदी किरकोळ, क्षुद्र, वरवरचे आणि सापेक्ष बनवितो. खरोखरच परिणाम काय असू शकतात, काय असायला हवेत, ते आपल्याला कळत नाहीत. आपल्याला ते नंतर कळतात. जेव्हा तो परिणाम घडून येतो तेव्हा आपण मागे वळून बघतो, आपण म्हणतो, ''अच्छा! म्हणजे माझी

वाटचाल या दिशेने चालू होती तर...'' पण आपल्याला मात्र ते नंतर, उशिरा समजते. त्याआधी आपल्याला त्याची फक्त धूसर कल्पना असते आणि ती कल्पना आपल्या खऱ्या प्रगतीच्या, खऱ्या रूपांतराच्या तुलनेत काहीशी वरवरची, बालिश असते.

तेव्हा पहिला मुद्दा हा की, आपल्याला एक आस असते पण त्याचे खरे परिणाम काय असायला हवेत हे आपल्याला खऱ्या अर्थाने कळू शकत नाहीत. एका ईश्वरालाच केवळ ते कळू शकतात.

आणि दुसरा मुद्दा असा की, आपण जर ईश्वराला असे सांगितले की, ''मी तुला माझे प्रयत्न अर्पण करत आहे, पण त्या बदल्यात मला माझी प्रगती झालेली हवी आहे, अन्यथा मी तुला काहीही देणार नाही." तर ही निव्वळ सौदेबाजी झाली.

उत्स्फूर्त, सहजस्वाभाविकपणे केलेली कृती, मी या व्यतिरिक्त अन्य काहीही करू इच्छित नाही असे म्हणून व्यक्तीने केलेली कृती आणि सदिच्छायुक्त भावनेने अर्पण केलेली कृती ही अशी एकमेव कृती असते की, जिला खरोखर काहीतरी मूल्य असते.

- श्रीमाताजी

(CWM 09 : 316-318)

**

## कृतज्ञ शरणागती

(एक साधक श्रीमाताजीच्या 'चार तपस्या आणि चार मुक्ती' लेखामधील पुढील वचन वाचतो...)

"...अशा व्यक्ती पूर्णतः ईश्वराच्या झालेल्या असतात; त्यांच्या जीवनातील साऱ्या घटना या ईश्वरी इच्छेची अभिव्यक्ती असतात आणि त्या साऱ्या घटना अशा व्यक्ती केवळ शांत शरणागतीने स्वीकारतात असे नाही तर, त्या घटनांचा स्वीकार त्या व्यक्ती कृतज्ञतेने करतात; कारण त्यांच्या बाबतीत जे काही घडते ते त्यांच्या भल्यासाठीच घडते याची अशा व्यक्तींना पूर्ण खात्री असते.''

प्रश्न : वरील उताऱ्यामध्ये उद्धृत केल्याप्रमाणे, शांत शरणागती आणि कृतज्ञ शरणागती यामध्ये फरक काय असतो?

श्रीमाताजी : शांत शरणागती आणि कृतज्ञ शरणागती यामधील फरक तुम्हाला जाणून घ्यायचा आहे का? ठीक आहे... तुम्हाला जेव्हा एखादा आदेश मिळतो तेव्हा तुम्ही त्या आदेशाचे बरेचदा नाखुषीने पालन करता कारण, तुम्ही शरणागती पत्करण्याचा निर्धार केलेला असतो आणि त्यामुळे तुम्ही कोणत्याही खुषीविना किंवा आनंदाविना, अगदी शुष्कपणे आणि वरवर त्या आदेशाचे पालन करता आणि तुम्ही स्वतःला सांगता, ''मला अमुक अमुक करायला सांगण्यात आले आहे आणि त्यामुळे आता मी त्याप्रमाणे करत आहे.'' याचा अर्थ असा की, तुम्ही काही समजून घेण्याचा प्रयत्न करत नाही आणि तुम्हाला जे काही करायला सांगण्यात आलेले असते, त्याचे स्वखुषीने पालन करण्याचा तुम्ही प्रयत्न करत नाही. ही झाली नाखुषीने पत्करलेली शरणागती. तुम्ही तुमच्या नियतीचा स्वीकार करता आणि तुम्ही तक्रार करत नाही ती त्यामुळेच! कारण तुम्ही तक्रार करायची नाही असा निश्चय केलेला असतो, या निश्चयामुळेच तुम्ही तक्रार करत नाही, अन्यथा तुम्ही तक्रार केलीच असती.

दुसरा प्रकार म्हणजे अमुक एक आदेश का देण्यात आला आहे ते समजून घेणे, त्याच्या आंतरिक मूल्याचे आकलन करणे, आणि जे करण्यास सांगण्यात आलेले आहे, ते व्यक्तीने स्वतःच्या सामर्थ्यानिशी, ज्ञानानिशी, आनंदाने अभिव्यक्त करण्याची इच्छा बाळगणे; आणि त्याचा परिणाम म्हणून ईश्वर तुमच्या अधिक सन्निध येण्यासाठी आणि तुमचे पूर्ण समाधान करण्यासाठी बांधील असतो. अशा रीतीने तुम्ही आनंदी होता, समाधानी होता आणि मग तुम्ही त्याला सहकार्य करता. त्यामुळे बराच फरक पडतो.

- श्रीमाताजी

(CWM 06 : 63-64)

**

## तत्त्व किंवा इच्छावासना

अहंकारी मनाचा दृष्टिकोन असा असतो की, माझ्या इच्छांची पूर्तता करण्यासाठी साऱ्या जगाचे नुकसान झाले तरी हरकत नाही. असे अहंकारी मन त्याची तत्त्वे साऱ्यांवर लादू पाहत असते.

दिव्य दृष्टीला मात्र, तत्त्व किंवा इच्छावासना, एकसारख्याच भासतात. कारण तिच्या दृष्टीने, इच्छावासना म्हणजे प्राणाचा लहरीपणा असतो तर तत्त्व हा मनाचा लहरीपणा असतो.

- श्रीमाताजी

(CWM 14 : 342)

**

## कृतज्ञता व्यक्त करण्याचा सर्वोत्तम मार्ग

कृतज्ञता व्यक्त करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे आपण आपल्यामधील अहंकारावर मात केली पाहिजे आणि या रूपांतरणाच्या दिशेने सातत्यपूर्ण प्रयत्न केले पाहिजेत. 'इतरजण तरी कुठे रूपांतरित झाले आहेत,' या सबबीखाली मानवी अहंभाव स्वतःचा परित्याग करण्यास नकार देतो. परंतु ही एक प्रकारे त्याच्यावर असणारी दुरिच्छेची पकड असते, कारण इतर काय करतात किंवा काय करत नाहीत याकडे लक्ष न देता, स्वतःमध्ये रूपांतर घडविणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असते.

हे रूपांतर, अहंकाराचा निरास करणे हा स्थायी शांती आणि आनंद मिळविण्याचा एकमेव मार्ग आहे, हे जर लोकांना समजले तर मग आवश्यक प्रयत्न करण्यास ते संमती देतील. हा ठाम विश्वासच त्यांच्यामध्ये जागृत करण्याची आवश्यकता आहे.

प्रत्येकाला हे वारंवार सांगितले पाहिजे की, तुमच्या अहंकाराचा निरास करा म्हणजे शांती तुमच्यावर सत्ता प्रस्थापित करेल.

'ईश्वरी' साहाय्य प्रामाणिक अभीप्सेला नेहमीच प्रतिसाद देते.

- श्रीमाताजी

(CWM 16 : 428)

**

## कृतज्ञतेची ज्योत

सर्व अहंकार आणि सर्व अंधकार नाहीसा करण्यासाठी, कृतज्ञतेची शुद्ध, उबदार, मधुर आणि तेजस्वी ज्योत आपल्या हृदयामध्ये कायमच प्रज्वलित असली पाहिजे. साधकाला त्याच्या उद्दिष्टाप्रत घेऊन जाणाऱ्या 'परमेश्वरी कृपे'बद्दलच्या कृतज्ञतेची ही ज्योत कायमच प्रज्वलित असली पाहिजे. व्यक्ती जितकी अधिक कृतज्ञ राहील, तिला ईश्वरी कृपेच्या

कृतीची जेवढी अधिक जाणीव असेल आणि त्याबद्दल ती जेवढी अधिक कृतज्ञ राहील, तेवढा मार्ग जवळचा होईल.

*

अहंकार हा आपल्याला काय हवे आहे आणि आपल्यापाशी काय नाही, याचा विचार सातत्याने करत असतो. अहंकार सतत याच विचारांनी व्याप्त असतो.

आपल्याला काय प्रदान करण्यात आलेले आहे, याची आत्म्याला जाणीव असते आणि तो अनंत अशा कृतज्ञतेमध्ये निवास करत असतो.

*

अंधकाराचा काळ वारंवार येत असतो आणि ही गोष्ट सार्वत्रिक असते. अशा वेळी सहसा, कधी आध्यात्मिक रात्री तर कधी पूर्ण प्रकाशाचे दिवस, असे आलटूनपालटून येत असतात, हे जाणून, कोणतीही काळजी न करता केवळ शांत राहणे पुरेसे असते. परंतु तुम्हाला शांतीमध्ये स्थिर राहता यावे यासाठी म्हणून तुम्ही, तुमच्या हृदयामध्ये 'ईश्वरा'विषयी कृतज्ञता बाळगली पाहिजे. 'ईश्वर' तुम्हाला जे साहाय्य करतो त्याबद्दलची ही कृतज्ञता असली पाहिजे. परंतु जर ही कृतज्ञताही झाकोळली गेली तर मात्र अंधकाराचा कालावधी दीर्घकाळ राहण्याची शक्यता असते. असे असले तरी एक वेगवान आणि परिणामकारक उपायदेखील असतो, तो असा की : शुद्धीकरणाची ज्योत तुमच्या हृदयामध्ये कायम प्रज्वलित ठेवली पाहिजे. प्रगतीची आस, उत्कटता, आत्मनिवेदनाची इच्छा ही कायम ज्वलंत असली पाहिजे. जे कोणी प्रामाणिक असतात त्यांच्या हृदयामध्ये ही ज्योत प्रज्वलित होते; मात्र तुम्ही तुमच्या कृतघ्नपणाच्या राखेने ती ज्योत विझू देता कामा नये.

- श्रीमाताजी

(Bulletin 1964 - 08 : 100), (CWM 14 : 257), (CWM 14 : 246-247)

**

## श्रीअरविंदांविषयी कृतज्ञता

आज सायंकाळी आपण श्रीअरविंदांच्या स्मृतींचे चिंतन करू, त्यांनी दाखविलेल्या मार्गाचे ध्यान करू, त्यांच्याप्रत असलेल्या कृतज्ञतेचे ध्यान

करू. त्यांनी दाखविलेला मार्ग आपल्यामध्ये जीवित राहावा यासाठी आपण त्या मार्गाचे ध्यान करू. त्यांनी आपल्यासाठी आजवर जे काही केले आणि त्यांच्या सदा प्रकाशमान, सचेतन आणि सक्रिय चेतनेमध्ये - महान साक्षात्कारासाठी ते आजही जे काही करत आहेत - जो साक्षात्कार या पृथ्वीवर केवळ घोषित करण्यासाठीच नव्हे तर, तो प्रत्यक्षात उतरविण्यासाठी ते आले आहेत आणि तो मूर्त रूपात आणण्यासाठी ते आजही कार्यरत आहेत, त्या साऱ्याबद्दल आपण जे 'कृतज्ञता'पूर्वक देणे लागतो, त्यासाठी आपण ध्यान करू.

- श्रीमाताजी

(CWM 09 : 172)

*****

## ‘अभीप्सा’ मराठी मासिकाविषयी

पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या, श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असणाऱ्या All India Magazine या इंग्रजी मासिकाची ‘अभीप्सा’ ही मराठी आवृत्ती आहे.

**मासिकाचा विषय**

महायोगी श्रीअरविंद आणि त्यांच्या आध्यात्मिक सहयोगिनी श्रीमाताजी यांच्या विचारांचा मराठी अनुवाद

**प्रकाशन** : दर महिन्याचा साधारण पहिला आठवडा

**पृष्ठसंख्या** : ४० पाने

**अभीप्सा मासिक वर्गणीचा तपशील**

१ वर्ष : २०० रू. (१२ अंक घरपोच)
३ वर्ष : ५८० रू. (३६ अंक घरपोच)
५ वर्ष : ९६० रू. (६० अंक घरपोच)
देणगीदार : ४००० रू. व त्यापुढील रक्कम
(देणग्या 80G अंतर्गत सवलतीस पात्र आहेत. )
एका अंकाची किंमत : १५ रू./-

**ऑनलाईन वर्गणी वा देणगीसाठी बँकेचा तपशील**

बँकेचे नाव : Central Bank of India
खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
IFSC Code : CBIN0281354
A/C No : 1235467709

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता
editorabhipsa2018@gmail.com
या ईमेल आयडीवर पाठवावा; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

**अधिक माहितीसाठी**

संपर्क क्र. : ९४२१०१६०८९
डॉ. केतकी मोडक
संपादक, अभीप्सा मराठी मासिक